जलयुक्त शिवार अभियानात जलसंपदा विभागाने सक्रिय सहभाग घेण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

## जलसंपदा विभाग

### शासन आदेश क्रमांकः सीडीए-१०१५/(२६/१५) लाक्षेवि(कामे)

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक: ३१.०१.२०१५

वाचा -

१) शासन निर्णय क्रमांकः **जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र.जलअ-२०१४/प्र.क्र.२०३/जल-७, दि.०५.१२.२०१४**

प्रस्तावना -

महाराष्ट्र राज्यात सतत उद्भवणारी पाणी टंचाई विचारात घेवून "सर्वासाठी पाणी- टंचाईमुक्त महाराष्ट्र २०१९" अंतर्गत जलयुक्त शिवार अभियान हाती घेण्यात आले आहे. या अभियानाची उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत.

१. पावसाचे जास्तीत जास्त पाणी गावाचे शिवारातच अडविणे.
२. भूगर्भातील पाण्याच्या पातळीत वाढ करणे
३. राज्याच्या सिंचनक्षेत्रात वाढ करणे - शेती साठी संरक्षित पाणी व पाण्याच्या वापराच्या कार्यक्षमतेत वाढ करणे.
४. राज्यातील सर्वाना पुरेशा प्रमाणात पाणी उपलब्ध करण्याची शाश्वता - ग्रामीण भागातील बंद पडलेल्या पाणी पुरवठा योजनांचे पुनर्जिवीकरण करुन पाणी पुरवठयात वाढ करणे.
५. भूजल अधिनियम अंमलबजावणी
६. विकेंद्रीत पाणी साठे निर्माण करणे
७. पाणी साठवण क्षमता निर्माण करणारी नविन कामे हाती घेणे.
८. अस्तित्वातील असलेले व निकामी झालेल्या जलस्त्रोत्रांची (बंधारे / गाव तलाव /पाझर तलाव/ सिमेंट बंधारे) पाणी साठवण क्षमता पुनःस्थापित करणे / वाढविणे.
९. अस्तित्वातील जलस्त्रोतांमधील गाळ लोक सहभागातून काढून जलस्त्रोतांचा पाणीसाठा वाढविणे.
१०. वृक्ष लागवडीस प्रोत्साहन देऊन वृक्ष लागवड करणे.
११. पाण्याच्या ताळेबंदाबाबत जनतेत जाणीव / जागृती निर्माण करणे.
१२. शेतीसाठी पाण्याचा कार्यक्षम वापर करणेस प्रोत्साहन / जनजागृती करणे.
१३. पाणी अडविणे /जिरविणे बाबत लोकांना प्रोत्साहित (Sensitize) करणे /लोकसहभाग वाढविणे.

ही उद्दिष्टे पूर्ण करणेसाठी एकात्मीक पध्दतीने सर्व विभागाच्या समन्वयाने नियोजनबध्द आराखडा तयार करुन त्याची अंमलबजावणी करावयाची आहे.यासाठी जलसंधारण विभागाने उपरोक्त शासन निर्णय निर्गमित केला आहे. हे अभियान परिणामकारकरित्या राबविण्यासाठी विभागीय समन्वय समिती, जिल्हास्तरीय समिती, तालुकास्तरीय समिती गठीत करण्यात आलेली आहे. या समिती मध्ये जलसंपदा विभागातील अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता, उपविभागीय अभियंता यांचा समावेश आहे.

या अभियानातंर्गत करावयाची कामे खालीलप्रमाणे आहेत.

१. पाणलोट विकासाची कामे.
२. साखळी सिमेंट कॉंक्रिट नाला बंधाऱ्याची कामे, नाला खोलीकरण/रुंदीकरणासह करणे.

३. जुन्या जलसंरचनाचे पुनर्जिवन करणे..
४. अस्तित्वातील लघु पाटबंधारे संरचनांची (केटी वेअर/साठवण बंधारा) दुरुस्ती करणे.
५. पाझर तलाव, लघु सिंचन तलाव दुरुस्ती, नुतनीकरण व क्षमता पुर्नस्थापित करणे. (RRR)
६. पाझर तलाव / गाव तलाव / साठवण तलाव /शिवकालीन तलाव / ब्रिटीश कालीन तलाव / निजामकालीन तलाव / माती नालाबंधातील गाळ काढणे.
७. मध्यम व मोठया प्रकल्पाची सिंचन क्षमतेनुसार प्रत्यक्ष वापर होण्यासाठी उपाययोजना करणे.
८. छोटे ओढे / नाले जोड प्रकल्प राबविणे.
९. विहीर / बोअरवेल पुनर्भरण कामे.
१०.उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम वापर.
११.पिण्याच्या पाण्याचे स्रोत बळकट करणे.
१२.पाणी वापर संस्था बळकट करणे.
१३. कालवा दुरुस्त करणे.

उपरोक्त कामामध्ये जलसंपदा विभागाचा सक्रिय सहभाग घेणेसाठी आदेश देण्याचे शासनाच्या विचाराधीन होते.

## शासन आदेश -

जलसंधारण विभागाने उपरोक्त प्रमाणे निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार जलसंपदा विभागाशी संबंधित सर्व कामांमध्ये सक्रिय सहभाग घेऊन या आदेशाचे काटेकोर पालन व्हावे.

१) या अभियानांतर्गत स्थापन केलेल्या विभागीय समन्वय समितीमध्ये सिंचन व्यवस्थापनांशी संबंधीत अधीक्षक अभियंता यांनी सदस्य म्हणून काम पहावे. ज्या विभागात व्यवस्थापनाशी संबंधित अधीक्षक अभियंता एका पेक्षा अधिक असतील अशा ठिकाणी कार्यकारी संचालकांनी निर्णय घेवून तसे आदेश निर्गमित करावे. तथापि कामाची प्रत्यक्ष अंमलबजावणी त्या त्या कार्यक्षेत्राशी व कामाच्या प्रकाराशी संबंधीत अधीक्षक अभियंता यांनीची करावी व समिती सदस्य तथा अधीक्षक अभियंता यांना संपूर्ण सहकार्य करावे, वेळोवेळी बैठकीसाठीची माहिती द्यावी.

२) या अभियानातंर्गत स्थापन केलेल्या जिल्हास्तरीय समितीमध्ये कार्यकारी अभियंता जलसंपदा विभाग हे सदस्य आहेत. जिल्हामुख्यालयी असलेल्या व सिंचन व्यवस्थापनाशी संबंधित किंवा लघु पाटबंधारे प्रकल्पाचे कार्यकारी अभियंता हे या समितीचे सदस्य राहतील. याबाबत विचार विनिमय करुन सिंचन व्यवस्थापनाशी संबंधित मुख्य अभियंता यांनी आदेश निर्गमित करावे. तथापी जलसंपदा विभागाशी संबंधित सर्वच कार्यकारी अभियंता यांनी या अभियानात सहभाग घ्यावयाचा आहे. संबंधितीचे कार्यक्षेत्रातील व त्यांचे कार्यप्रकारानुसार या अभियानातील कामे त्यांनी करावयाचे आहे. या सर्व कार्यकारी अभियंता यांनी जिल्हास्तरीय समिती सदस्य तथा कार्यकारी अभियंता यांना संपूर्ण सहकार्य करावयाचे आहे . जिल्हास्तरीय समितीच्या सर्व आदेशाचे काटेकोरपणे पालन करावे, अंमलबजावणी करावी, वेळोवळी माहिती दयावी.

३) या अभियांना अंतर्गत स्थापन केलेल्या तालुकास्तरीय समितीमध्ये उप अभियंता, जलसंपदा हे सदस्य आहेत. जलयुक्त शिवार अभियान लाभक्षेत्रात व लाभक्षेत्राबाहेर सुध्दा राबविण्यात येणार असल्याने सर्वच ठिकाणी सिंचन व्यवस्थापनाशी संबंधीत उप अभियंता उपलब्ध होतील असे नाही. त्यामुळे ज्या तालुका मुख्यालयी सिंचन व्ययवस्थापनाशी संबंधित उपअभियंता आहेत त्या ठिकाणी त्यांनी तालुकास्तरीय समितीचे सदस्य म्हणून काम पहावे अन्य ठिकाणी प्राध्यान्याने लघु पाटबंधारे प्रकल्पाशी संबंधित उपअभियंता यांनी सदस्य म्हणून काम करावे. त्याचे सविस्तर आदेश जिल्हास्तरीय समितीचे सदस्य तथा कार्यकारी अभियंता यांनी काढावे. जलसंपदा विभागातील संबंधीत तालुक्यात काम करणारे सर्व उप अभियंता यांनी अभियानांशी संबंधीत त्यांचे कार्यक्षेत्रातील व तालुक्यातील कामे करावयाची आहेत. या सर्व उप अभियंता यांनी सदस्य तालुकास्तरीय समिति तथा उपअभियता यांना संपुर्ण सहकार्य व वेळोवळी लागणारी माहिती देण्यात यावी. तसेच समितीने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात यावी.

४) विभागीय समन्वय समिती सदस्य तथा अधीक्षक अभियंता यांनी त्यांचे विभागातील सर्व जिल्हास्तरीय समितीतील जलसंपदा विभागाच्या सदस्यांशी समन्वय व संनियत्रंण करावे व आपल्या विभागात अभियान यशस्वी करावे.

५) जिल्हास्तरीय समिती सदस्य तथा कार्यकारी अभियंता यांनी त्यांचे जिल्हयातील जलसंपदा विभागाच्या तालुकास्तरीय समितीच्या जलसंपदा विभागाच्या सदस्यांशी समन्वय व संनियत्रंण करावे व आपल्या जिल्हयात अभियान यशस्वी करावे.

६) दिनांक ५ डिसेंबर २०१४ च्या शासन निर्णयातील परिच्छेद २३ (ख) नूसार जलसंपदा विभागातील अंमलबजावणी कार्यालय म्हणून (डिलीव्हरी मॅनेजमेंट ऑफीस ) अधीक्षक अभियंता व उपसचिव (लाक्षेवि) यांच्या कार्यासनामध्ये कामकाज होईल तसेच नोडल अधिकारी म्हणून अधीक्षक अभियंता व उपसचिव (लाक्षेवि) यांना या आदेशाव्दारे नियुक्त करण्यात येत आहे.

जलयुक्त शिवार अभियानाचे जलसंपदा विभागातील समन्वय उप सचिव (लाक्षेवि) हे करतील. त्यामुळे या विषयाबाबतचा पत्रव्यवहार उप सचिव (लाक्षेवि) यांच्याशी करावा. विभागीय समिती सदस्य तथा अधीक्षक अभियंता यांनी यासंदर्भातील अहवाल वेळोवेळी या कार्यासनास सादर करावे.

७) या अभियानाची संपुर्ण कार्यपध्दती, उपलब्ध होऊ शकणारा निधी याबाबतच्या सूचना जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र.जलअ-२०१४/प्र.क्र.२०३/जल-७, दि.०५.१२.२०१४ या शासन निर्णयामध्ये नमूद करण्यात आल्या आहेत. त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

८) जलसंपदा विभागाशी सर्व संबंधित अभियंते / अधिकारी / कर्मचारी यांनी या अभियानात सक्रिय सहभाग घेवून अभियान यशस्वी करावे.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०१३११६१८५०५६२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Samadhan Kondiba Sabbinwar

Digitally signed by Samadhan Kondiba Sabbinwar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Superintendent Engineer And Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Samadhan Kondiba Sabbinwar
Date: 2015.02.02 16:08:01 +05'30'

(स.कों.सब्बीनवार)
शासनाचे उप सचिव

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
२. मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव,
३. सर्व मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४. मा.मंत्री, जलसंपदा विभाग, यांचे खाजगी सचिव
५. मा.प्रधान सचिव (जलसंपदा) यांचे स्वीय सहाय्यक
६. मा.सचिव (लाक्षेवि) यांचे स्वीय सहाय्यक
७. सचिव, जलसंधारण विभाग, मंत्रालय,
८. सर्व कार्यकारी संचालक, जलसंपदा विभाग
९. महासंचालक, जल व भूमी व्यवस्थापन संस्था, (वाल्मी) औरंगाबाद
१०.महासंचालक, महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी (मेटा) नाशिक
११.महासंचालक, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था (मेरी) नाशिक
१२.सर्व विभागीय आयुक्त,
१३.सर्व मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग
१४.सर्व जिल्हाधिकारी
१५.सर्व सह सचिव / उप सचिव / जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
१६.सर्व अधीक्षक अभियंता, जलसंपदा विभाग
१७.सर्व कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग
१८. अवर सचिव/कक्ष अधिकारी / जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
१९.निवड नस्ती.